INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# मंदिरस्थापत्य शैलीचा उगम : एक दृष्टिक्षेप
# (Origin of Temple Architectural style: A glance)

**प्रा.डॉ. आर.ए. चव्हाण**
इतिहास विभाग,
महिला महाविद्यालय, गेवराई, जि. बीड.
E-mail: rchavan1972@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/02.2025-85411336/IRJHIS2501005**

**प्रस्तावना :**

प्राचीन भारतीयांनी निर्माण केलेल्या वास्तुंमध्ये मंदिरस्थापत्य प्रकार महत्वाचा आहे. या स्थापत्य प्रकाराची सुरूवात उद्‌गम विकास होत गेला आणि आज हा स्थापत्य प्रकार परिणत अवस्थेत आपल्याला पहावयास मिळतो. लक्षावधी मंदिर भारतात निर्माण झाली. या स्थापत्याविषयी वेगवेगळे शास्त्र विकसित झाले. तंत्रज्ञान, कलाकुसर, कोरीवकाम, भव्यता या सर्वच दृष्टीने हे शास्त्र आणि मंदिरस्थापत्य हे परिपूर्ण होत गेले. मंदिर स्थापत्य हे धार्मिक संकल्पनेशी निगडित आहे.

**मंदिरस्थापत्य :**

बौध्द, जैन, हिंदू धर्मियांनी मंदिरस्थापत्य विकसित केले. त्यातही हिंदू धर्मियांनी या स्थापत्याची भरघोस निर्मिती केली. 'देवस्य देवानाम वा आलय: इति देवालय:' असं म्हटलंय. देवाचं निवासस्थान देवालय किंवा मंदिर या वास्तुवरून त्याचा उद्देश स्पष्ट होतो. वास्तुच्या आधी मूर्ती निर्माण झाल्या निसर्गात घडणाऱ्या घटनांची जबाबदारी मानवाने ईश्वर या कल्पनेवर टाकली व विविध घटकांची पूजा करणे त्यांनी सूरू केली. कुटूंबव्यवस्था घर या संकल्पना पूर्णपणे विकसित होऊन प्रत्यक्षात उतरल्या होत्या आपल्याला जसं घर लागतं तसं देवालाही लागत असलं पाहिजे. या भावनेतून मंदिराची निर्मिती झाली.[१]

मंदिरांचे बांधकाम मोठमोठ्या घडीव पाषाणांच्या शिळ्यांमधून चौरस आयताकृती असे ठोकळे तयार करण्यात आले हे ठोकळे एकमेकांवर रचून मंदिर तयार केलेले आहेत. चौरसाकृती गाभारा मुखमंडप, स्तंभ, द्वारशाखा प्रदक्षिणापथ, विधान, गर्भगृह, अर्धमंडप, अंतराळ, मंडपशिखर अशा प्रकारची रचना करण्यात येते.[२]

**मंदिरस्थापत्य शैली :**

धार्मिक स्थापत्याच्या दृष्टीने मंदिरस्थापत्य कला भारतीयांसाठी महत्वपूर्ण होती त्यासाठी मंदिराची निर्मिती झाली. त्यामध्ये तीन प्रकारची स्थापत्यशैली उदयास आली. नागर, द्रविड व वेसर या शैलीचा वापर करण्यात आला.

**१) नागर शैली :**

नागर शैली नगर या नावावरून बनविली आहे. त्याचा अर्थ सर्व मंदिराची रचना ही नगर रचनेनूसार झाली आहे. कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' ग्रंथात मंदिराचे स्थान महत्वपूर्ण आहे. मंदिर हे नगररचना वास्तुशास्त्रानुसार आहे.[३] ही शैली

प्रामुख्याने उत्तर भारतात वापरली गेली. यामध्ये नागर मंदिराचा गाभारा, अंतराळ, मंडप, मुखमंडप हे एकापूढे एक - बहुतांशी चौरस आकारात असतात मंडपांना दोन्ही बाजूंना मुखमंडप त्यात काही मंडप उघडे त्यास तिनही बाजुंना अर्ध्या भिंती असतात. नागर मंदिराची भिंत मोडणी केलेली पुढे-मागे अशा प्रकारात बांधलेली असते. गाभाऱ्याचे शिखर सर्वात उंच इतरांपेक्षा कमी-कमी आढळते. नागर मंदिरातील वास्तु घटकांना स्वतंत्र छप्पर आढळते. नागर शिखर उंच आणि वरच्या टोकापासून तळापर्यंत उभ्या रेषांचे बनवले आहे. उत्तर भारतातील ओरिसा, मध्य प्रदेश येथील मंदिर नागरशैलीचे आहेत. जगप्रसिध्द कोणार्क मंदिराची निर्मिती या शैलीची असून तेराव्या शतकात झाली.

**२) द्रविड शैली :**

ही शैली दक्षिण भारतात वापरली असून ती लोकप्रिय झाली. गाभारा चौरस, गाभारा व मुखमंडप यामध्ये एक अर्ध मंडप, मंडप आयताकार, मोठ्या आकाराची आहे. वाहन मंडप स्वतंत्र आहेत. भिंतीची मोडणी फारशी नसते एक आड एक भाग पुढे अर्धस्तंभाच्या सहाय्याने देव कोष्ठ तयार करून त्यात मूर्ती /शिल्पे बसविलेले असतात. मंदिराच्या गाभाऱ्यावरचे शिखर उंच असते व उंचीला फार महत्व नसते. बदामी, ऐहोळ, पदकल येथे चालुक्य राजवंशाच्या काळात मोठा मंदिर समूह बांधला गेला. या समुहात प्रामुख्याने द्रविडशैलीचे मंदिरे आहेत.[४]

**३) वेसर शैली :**

(भूमिज) यापैकी वेसर शैलीची मंदिर मुख्यत: कर्नाटकात बांधलेली आहेत. कल्याणीचे चालुक्य द्वारसमुद्राचे होयसळ यांनी वेसर मंदिरशैलीतील मंदिर बांधले. द्रविड शैलीतुन काही वास्तुघटक घेवून वेसर शैली तयार केली गेली.[५]

महाराष्ट्रात यादव काळातील हेमाडपंथी मंदिरशैली म्हणून ओळखली जाणारी आहे. देवगिरीच्या महादेव व रामदेवराय यांच्या कारकिर्दीत प्रधानसचिव असलेला हेमाद्रीने यादवाबद्दल दक्षिण भारतात असंख्य शिलालेख, तांम्रपट, वास्तुमंडळ इ. ची माहिती मिळते.[६] या काळातील शेवटचे म्हणजे यादवांच्या काळात हेमाडपंथी पध्दतीच्या देवळांची / मंदिराची रचना उदयास आली. ही पध्दत दगडावर दगड ठेवून चुनामाती न वापरता केली जात असे. या मंदिराच्या पायाची आखणी कोनबध्द असे. यावरील भिंतीच्या कोनरेषा जमिनीपासून थेट कळसापर्यंत पोहचतं. सातगाव येथील विष्णू मंदिर, लोणार येथील दैत्य सदना अशी काही मंदिरे हे हेमाडपंथी पध्दतीची साक्ष देतात.[७]

हेमाडपंथी म्हणून प्रत्येक दगडी मंदिर एकाच मापात तोलु नयेत. संपूर्ण भारतातील प्राचीन दगडी मंदिर बांधतांना चुना-माती व सिमेंट याचा वापर केला गेला नाही. एकमेकांवर दगड रचतांना एका शेजारी एक लावतांना विशिष्ट पध्दतीने खाचा करून ते जोडले जात. काही प्रमाणात महाराष्ट्रातील मंदिराचा छतापर्यंतचा भाग दगडाचा पण शिखर विटांची बांधलेली दिसतात. या मागचे कारण काय असावे? दगड कमी पडला असे म्हणताच येत नाही कारण, महाराष्ट्र प्रामुख्याने दगडांचा प्रदेश आहे. उंचावर दगड चढवता आले नसावेत असेही म्हणता येणार नाही कारण त्याचे शास्त्र आपल्या स्थापितांना अवगत होते. दगड शिखराचे मंदिर मोठ्या प्रमाणात घडविले आहेत.[८]

यादवकालिन हेमाडपंथी मंदिर मोठ्या प्रमाणात मराठवाडा विभागात दिसून येतात.[९]

**निष्कर्ष :**

१) मंदिरांच्या अवशेषांचे जतन करणे.

२) मंदिराचा जिर्णाध्दार स्थापत्यतज्ञांच्या मार्गदर्शनाने करणे.

३) स्थापत्य शास्त्राचा विकास करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

**सारांश :**

मंदिरस्थापत्य शैलीमध्ये प्रत्येक दगड जेथे आहे तेथेच असला पाहिजे कारण त्यामागे अनेक प्रकारचे स्थापत्यशास्त्र त्यांनी विकसित केलेले असतात. अनेक महत्वाच्या जागा आज बदललेली आहेत. लोकांना धार्मिक दृष्टिकोनातून जरी काही फरक पडत नसला तरी ऐतिहासिक स्थापत्य शास्त्राच्या दृष्टीने ही फार मोठी गंभिर हानीकारक गोष्ट आहे. मंदिरस्थापत्य शैलीचा अभ्यास करत असतांना वरील शैलीचा उदय विकास वैशिष्ट्ये काय आहेत या शैलीनुसार परिपूर्ण विकसित अशी मंदिराची उदाहरणे आढळतात असे नाही. एकूण मंदिर स्थापत्याचा अभ्यास करतांना इतिहासाचा अगदी माफक आधार घेत आहोत. म्हणजे मंदिर कोणत्या कालखंडात बांधली गेली, कोणत्या राजवंशाच्या काळात बांधली गेली हे पाहिले आहे. यातुन मंदिर स्थापत्य शैलीचा अभ्यास करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

**संदर्भ सूची :**


१) डॉ. काळे भाग्यश्री, महाराष्ट्राची मंदिर शैली, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हे. २००९, पृष्ठ क्र.- १

२) डॉ. अत्रे शुभांगना, रायरीकर कल्पना व केंजळे सौमित्र, महाराष्ट्र संस्कृती, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हे. २०१८, पृष्ठ क्र. - १२४

३) डॉ. शर्मा श्याम, प्राचीन भारतीय कला वास्तुकला एवं मूर्तिकला, रिसर्च पब्लिकेशन, जयपूर, पृष्ठ क्र. - १११

४) डॉ. अत्रे शुभांगना, रायरीकर कल्पना व केंजळे सौमित्र (उपरोक्त) पृष्ठ क्र. - १२८

५) कित्ता, पृष्ठ क्र.- १२९

६) प्रा. सिंगारे अनिल, दक्षिण भारताचा इतिहास (सातवान ते यादव), कैलास पब्लिकेशन, छ. संभाजीनगर, प्रथम आवृत्ती, जून १९९७, पृष्ठ क्र.- १०७

७) सगणे शांताराम, आपला महाराष्ट्र परंपरा व प्रगती, महाराष्ट्र राज्य, मुंबई, ०१ मे १९८५, पृष्ठ क्र. - ६९

८) डॉ. काळे भाग्यश्री (उपरोक्त) पृष्ठ क्र. - ९४

९) देव प्रभाकर, द टेंम्पल ऑफ मराठवाडा, पब्लिकेशन स्किम, जयपूर, १९९३, पृष्ठ क्र. - ८०